जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

12 FEB 2020

तरुण भारत

# मोबाईलचा वापर संशोधनासाठी करा

**कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांचे आवाहन**

**कोल्हापूर :** विद्यार्थ्यांचा जास्तीतजास्त वेळ मोबाईल वापरामध्ये वाया जात असल्याचे संशोधनातून समोर आले आहे. विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर अभ्यासासाठी व संशोधनासाठी करावा असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही.डी. नांदवडेकर यांनी केले. श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयातील वार्षिक पारितोषिक वितरण समारंभप्रसंगी ते बोलत होते. यावेळी श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे मानद सचिव विजयराव बोंद्रे प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण होते.

डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, संचालक राजेंद्र जाधव - कसबेकर, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष बाबासाहेब पाटील आसुर्लेकर, ज्येष्ठ प्राध्यापक सुधाकर मानकर, प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. प्रा. प्रशांत पाटील यांनी स्वागत तर प्रा. राज बिरजे, प्रा. पी. के. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. पांडुरंग पाटील यांनी पाहुण्यांची ओळख करुन दिली. प्रा. डॉ. डी. एल. काशिद पाटील व प्रा. ए. बी. के. शेळके यांनी विद्यार्थ्यांचे नावाचे व पारितोषिकाचे वाचन केले. प्रा. डॉ. डी. के. वळवी यांनी आभार मानले.

# विद्यापीठात आज 'लकीर के इस तरफ' माहितीपट प्रदर्शन

कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) : शिवाजी विद्यापीठ विदेशी भाषा विभागाच्या वतीने बुधवारी (दि.१२) दुपारी ४.३० वाजता वि. स. खांडेकर भाषा भवन येथे 'लकीर के इस तरफ' हा माहितीपट प्रदर्शित केला जाणार आहे. यावेळी उपस्थित राहण्याचे आवाहन विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी केले आहे.

# विद्यापीठात संख्याशास्त्र अधिविभागात १४, १५ रोजी राष्ट्रीय चर्चासत्र

कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) : शिवाजी विद्यापीठातील संख्याशास्त्र अधिविभागामध्ये 'ॲडव्हान्सेस इन स्टॅटिस्टिकल मॉडेलिंग अँड इन्फेरेन्स' या विषयावर दि. १४ व १५ रोजी दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागातील निलांबरी सभागृहात हे चर्चासत्र होणार आहे. कोलकत्ता येथील इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूटच्या अप्लाईड स्टॅटिस्टिक्स विभागामधील प्रा. डॉ. मौसमी बोस बीजभाषक असणार आहेत. या चर्चासत्रामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन संख्याशास्त्र अधिविभागप्रमुख प्रा. डॉ. एच. एस. कुलकर्णी व संयोजक सोमनाथ पवार यांनी केले आहे.

# 'शिक्षण संस्था, विद्यापीठे यांच्या प्रगतीमध्ये माजी विद्यार्थ्यांचा वाटा'

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** उच्च शिक्षण संस्था आणि विद्यापीठे यांच्या प्रगतीमध्ये माजी विद्यार्थ्यांचा सिंहाचा वाटा असतो, असे प्रतिपादन प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले. शिवाजी विद्यापीठ वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागातर्फे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. डॉ. महाजन म्हणाले, शिक्षण पूर्ण केल्यानंतर व्यक्तिमत्त्व विकासास कारणीभूत असलेल्या संस्था व विभागास माजी विद्यार्थ्यांनी सहकार्याची भूमिका ठेवली पाहिजे. स्वागत योगेश माने यांनी केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांनी केले. डॉ. के. व्ही. मारुलकर यांनी आभार मानले. यावेळी चंद्रभागा गलुगडे-पाटील, डॉ. ए. जी. सूर्यवंशी, प्रा. आदिनाथ कांबळे, प्रा. एस. व्ही. यादव, प्रा. युवराज पाटील, डॉ. सागर वाळ्वेकर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

12 FEB 2020

तरुण भारत

# महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी संस्कार आवश्यक

**कोल्हापूर :** महिलांवर सातत्याने होणारे अत्याचार चिंताजनक आहेत. केवळ कायदे करून हा प्रश्न सुटणार नाही. कायद्याबरोबरच कुटुंबातील संस्कार आणि मूल्यशिक्षणावर भर देणे आवश्यक आहे, असे मत महिलांसदर्भातील कायद्याच्या अभ्यासक ज्योती शेट्ये यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या वतीने आयोजित 'महिला अत्याचार प्रतिबंधक कायदे' या विषयावर त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. निशा पवार होत्या.



**ज्योती शेट्ये यांचे प्रतिपादन**

ज्योती शेट्ये म्हणाल्या, महिलांना कायद्याचे संरक्षक कवच आहे. कुटुंबापासून ते सार्वजनिक कामाच्या ठिकाणांपर्यंत सर्वत्र महिलांना कायद्याने अभय दिले आहे. महिला व मुलींवरील अत्याचार थांबावेत यासाठी महाविद्यालये, विद्यापीठे तसेच अन्य संस्थांमध्येही अनेक उपाययोजना केल्या आहेत. एवढे करूनही समाजात महिला असुरक्षित आहेत. केवळ कायदे केले म्हणून हा प्रश्न निकालात निघेल, असे नाही. यासाठी कुटुंबापासून त्याची सुरुवात होणे आवश्यक आहे.

भारतीय समाजातील मूल्यव्यवस्था टिकवून ठेवणे आवश्यक आहे. यासाठी मूल्यशिक्षणावर भर दिला पाहिजे. महिलांना आदराचे स्थान मिळवून देण्यासाठी कायद्यापेक्षा मूल्यशिक्षण प्रभावी भूमिका बजावू शकेल. यासाठी प्रत्येक टप्प्यावर शिक्षणव्यवस्थेत मूल्यशिक्षणाचा अंतर्भाव करणे गरजेचे आहे. कायदे कितीही केले तरी त्याची अंमलबजावणी किती प्रभावीपणे होते यावर त्या कायद्याचे यशापयश अवलंबून असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. शिवाजी जाधव यांनी आभार मानले. यावेळी डॉ. सुमेधा साळुंखे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

# विद्यापीठात शुक्रवारपासून राष्ट्रीय चर्चासत्र

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील संख्याशास्त्र अधिविभागामध्ये 'ॲडव्हान्सेस इन स्टॅटिस्टिकल मॉडेलिंग ॲंड इन्फेरेन्स' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे. १४ व १५ फेब्रुवारी रोजी वनस्पतीशास्त्र विभागातील नीलांबरी सभागृहात हे चर्चासत्र होणार आहे. कोलकाता येथील 'इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्युट'च्या अप्लाइड स्टॅटिस्टिक्स विभागामधील प्रा. डॉ. मौसमी बोस यांचे प्रमुख भाषण होणार आहे. विविध राज्यातील संख्याशास्त्र संशोधक, तज्ज्ञ, व प्राध्यापक यामध्ये संशोधनाचे सादरीकरण करणार आहेत. चर्चासत्रामध्ये विद्यार्थी, संशोधक व अभ्यासकांनी सहभागी व्हावे असे आवाहन संख्याशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. एच. एस. कुलकर्णी व संयोजक सोमनाथ पवार यांनी केले आहे.

# 'कायद्याबरोबरच संस्कारावरही भर हवा'



ज्योती शेट्ये

कोल्हापूर : महिलांवर सातत्याने होणारे अत्याचार चिंताजनक आहेत. केवळ कायदे करून हा प्रश्न सुटणार नाही. कायद्याबरोबरच कुटुंबातील संस्कार आणि मूल्यशिक्षणावर भर देणे आवश्यक आहे, असे मत महिलांसदर्भातील कायद्याच्या अभ्यासक ज्योती शेट्ये यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या वतीने आयोजित 'महिला अत्याचार प्रतिबंधक कायदे' या विषयावर त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. निशा पवार होत्या. शेट्ये म्हणाल्या, 'केवळ कायदे केले म्हणून हा प्रश्न निकालात निघणार नाही. यासाठी मूल्यशिक्षणावर भर दिला पाहिजे. कायदे कितीही केले तरी त्याची अंमलबजावणी किती प्रभावीपणे होते यावर त्याचे यशापयश अवलंबून असते.' डॉ. सुमेधा साळुंखे यांनी स्वागत केले. डॉ. शिवाजी जाधव यांनी आभार मानले.

# अत्याचार रोखण्यासाठी मूल्यशिक्षण हवे : शेट्ये



**महिला अत्याचार प्रतिबंधक कायदे विषयावर मार्गदर्शन करताना कायद्याच्या अभ्यासक ज्योती शेट्ये.**

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

महिलांवर सातत्याने होणारे अत्याचार चिंताजनक आहेत. केवळ कायदे करून हा प्रश्न सुटणार नाही. कायद्याबरोबरच कुटुंबातील संस्कार आणि मूल्य शिक्षणावर भर देणे आवश्यक आहे, असे मत महिलांसदर्भातील कायद्याच्या अभ्यासक ज्योती शेट्ये यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या वतीने आयोजित 'महिला अत्याचार प्रतिबंधक कायदे' विषयावर त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. निशा पवार होत्या.

शेट्ये म्हणाल्या, महिलांना कायद्याचे संरक्षक कवच आहे. कुटुंबापासून ते सार्वजनिक कामाच्या ठिकाणांपर्यंत सर्वत्र महिलांना कायद्याने अभय दिले आहे. महिला व मुलींवरील अत्याचार थांबावेत यासाठी महाविद्यालये, विद्यापीठे तसेच अन्य संस्थांमध्येही अनेक उपाययोजना केल्या आहेत. एवढे करूनही समाजात महिला असुरक्षित आहेत. केवळ कायदे केले म्हणून हा प्रश्न निकालात निघेल, असे नाही. यासाठी कुटुंबापासून त्याची सुरुवात होणे आवश्यक आहे. मुलगा आणि मुलगी असा भेद करणे सर्वप्रथम थांबले पाहिजे. मुलीला समान दर्जा मिळत नाही, तोवर या प्रश्नाची तीव्रता कमी होणार नाही. त्या म्हणाल्या, भारतीय समाजातील मूल्यव्यवस्था टिकवून ठेवणे आवश्यक आहे. यासाठी मूल्य शिक्षणावर भर दिला पाहिजे. महिलांना आदराचे स्थान मिळवून देण्यासाठी कायद्यापेक्षा मूल्यशिक्षण प्रभावी भूमिका बजावू शकेल.

डॉ. शिवाजी जाधव यांनी आभार मानले. यावेळी डॉ. सुमेधा साळुंखे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

12 FEB 2020

तरुण भारत

# जिजाऊंमुळेच देशाला युगपुरुष लाभला

## वसंतराव मुळीक : विद्यापीठास जिजाऊ व शिवरायांचे तैलचित्र प्रदान



कोल्हापूर : छत्रपती शिवराय आणि राष्ट्रमाता जिजाऊसाहेब यांचे तैलचित्र कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे सुपूर्द करताना वसंतराव मुळीक, इंद्रजीत सावंत यांच्यासह अन्य मान्यवर. (छाया. शशिकांत मोरे)

प्रतिनिधी
कोल्हापूर

राष्ट्रमाता जिजाऊसाहेब यांचे संस्कार आणि प्रेरणा यामुळेच छत्रपती शिवाजी महाराज हिंदवी स्वराज्य स्थापन करू शकले. जिजाऊ माँसाहेबांच्या मार्गदर्शनामुळेच देशाला शिवछत्रपतींसारखा युगपुरुष लाभला. या दोघांचेही महात्म्य अधोरेखित करणारे तैलचित्र शिवाजी विद्यापीठाला प्रदान करताना होणारा आनंद अवर्णनीय आहे, असे मत अखिल भारतीय मराठा महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष वसंतराव मुळीक यांनी काढले. ते छत्रपती शिवराय व जिजाऊसाहेब यांचे तैलचित्र विद्यापीठास प्रदान प्रसंगी बोलत होते.

यावेळी इंद्रजीत सावंत यांनीही मनोगत व्यक्त केले. कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी हे तैलचित्र विद्यापीठाकडे सुपूर्द केल्याबद्दल आभार व्यक्त केले. शिवरायांच्या जडणघडणीत जिजाऊ माँसाहेबांचा मोलाचा वाटा आहे. हे दर्शविणारे तैलचित्र जे.बी. सुतार यांनी रेखाटले आहे. अत्यंत परिश्रमपूर्वक आणि बारकाव्यांनिशी अत्यंत जिवंत वाटाव्यात, अशा व्यक्तीरेखा त्यांनी रेखाटल्या आहेत. या तैलचित्राला राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात लावून योग्य तो सन्मान केला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी प्र-कुलगुरु डॉ. डी.टी. शिर्के, वित्त व लेखाधिकारी व्ही.टी. पाटील, डॉ. रत्नाकर पंडित, डॉ. प्रल्हाद माने, डॉ. गिरीष कुलकर्णी यांच्यासह इतिहास संशोधक गणेश नेर्लेकर-देसाई, शशिकांत पाटील, शंकरराव शेळके, शैलजा भोसले, प्रकाश पाटील, प्रताप नाईक, इंद्रजीत माने, अवधूत पाटील, शरद साळुंखे, कृष्णाजी हरुगडे, गुरुदास जाधव आदी उपस्थित होते.

### 'शिवरायांची कीर्ती सांगे, आईच माझा गुरु'

अखिल भारतीय मराठा महासंघ आणि शिवभक्त लोकआंदोलन समितीच्या वतीने शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात (दीक्षांत सभागृह) लावण्यासाठी राजमाता जिजाऊ आणि शिवराय यांची चित्रकृती कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली. 'शिवरायांची कीर्ती सांगे, आईच माझा गुरु' या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित चित्रकृती ज्येष्ठ चित्रकार जे. बी. सुतार यांनी रेखाटले आहे.

# ‘कॉफीटेबल बुकचा उपक्रम स्तुत्य’

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या सचित्र माहितीचा समावेश असलेल्या कॉफीटेबल बुकचा उपक्रम अत्यंत स्तुत्य व अनुकरणीय आहे, असे गौरवोद्गार महाराष्ट्राचे राज्यपाल तथा कुलपती भगतसिंह कोश्यारी यांनी सोमवारी येथे काढले.

विद्यापीठाच्या दीक्षान्त सोहळ्याचे अध्यक्ष म्हणून कुलपती कोश्यारी उपस्थित होते. समारंभापूर्वी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या दालनामध्ये कुलपतींच्या हस्ते शिवाजी विद्यापीठाच्या ‘पिक्चरेस्क् शिवाजी युनिव्हर्सिटी’ या कॉफी टेबल बुकचे प्रकाशन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. कोश्यारी म्हणाले, ‘कॉफीटेबल बुकच्या माध्यमातून विद्यापीठ परिसराचे सुंदर चित्रण केले आहे.’

# महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी संस्कार, मूल्यशिक्षण हवे : शेट्ये

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महिलांवर सातत्याने होणारे अत्याचार चिंताजनक आहेत. केवळ कायदे करून हा प्रश्न सुटणार नाही. कायद्याबरोबरच कुटुंबातील संस्कार व मूल्यशिक्षणावर भर देणे आवश्यक आहे, असे मत महिलांसदर्भातील कायद्याच्या अभ्यासक ज्योती शेट्ये यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागातर्फे आयोजित 'महिला अत्याचार प्रतिबंधक कायदे' या विषयावर त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. निशा पवार होत्या. शेट्ये म्हणाल्या, महिलांना कायद्याचे संरक्षक कवच आहे. कुटुंबापासून ते सार्वजनिक कामाच्या ठिकाणांपर्यंत सर्वत्र महिलांना कायद्याने अभय दिले आहे.

महिला व मुलींवरील अत्याचार थांबावेत यासाठी महाविद्यालये,



**कोल्हापूर : महिला अत्याचार प्रतिबंधक कायदे या विषयावर मार्गदर्शन करताना ज्योती शेट्ये.**

विद्यापीठे व अन्य संस्थांमध्ये अनेक उपाययोजना करूनही समाजात महिला असुरक्षित आहेत. केवळ कायदे केले म्हणून हा प्रश्न निकालात निघेल असे नाही. यासाठी कुटुंबापासून त्याची सुरुवात होणे आवश्यक आहे. मुलगा आणि मुलगी असा भेद करणे सर्वप्रथम थांबले पाहिजे. मुलीला समान दर्जा मिळत नाही, तोवर या प्रश्नाची तीव्रता कमी होणार नाही. डॉ. शिवाजी जाधव यांनी आभार मानले. यावेळी डॉ. सुमेधा साळुंखे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.